**महाराष्ट्र शासन - सार्वजनिक आरोग्य विभाग**
**राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय**
**डॉ. नायडू रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे-४११००१.**

उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजीआ)
तथा निबंधक विवाह मंडळ व विवाह
(विभागस्तरीय समन्वय)
महाराष्ट्र राज्य, पुणे

कार्यालय ☎ :- ०२० - २६०५९५३०
मा.सं. विभाग ☎:- ०२० - २६०५८६१०
फॅक्स क्रमांक :- ०२० - २६०५८२९२
ई-मेल :- mahvivah@gmail.com

अ.शा.पत्र क्र.आमाजिआ/कक्ष-८२/विवाह मंडळ नोंदणी/5408-5819/१६.
दिनांक -१३/०६/२०१६.

प्रति,
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद ....................(सर्व)

विषय :- विवाह मंडळाची नोंदणी न केलेल्या मंडळावर कारवाई करणेबाबत...

संदर्भ :१) मा.संचालक आरोग्य सेवा मुंबई यांचे पत्र जा.क्रं.संआसे/विवाह नोंदणी/कक्ष-१८/ २७४४-२८५७/ २०१६, दिनांक १७/३/२०१६, व समक्रमांकीत पत्र दिनांक ०२/०४२०१६, दिनांक २१/०४/२०१६ आणि दिनांक ०३/०५/१६

२) या कार्यालयाचे पत्र क्रं.आमाजीआ/कक्ष-८२/विवाह नोंदणी/४२८१-४३२३/१६, दिनांक २९/०४/२०१६,दिनांक ११/०५/२०१६

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम,१९९८ व त्याखालील महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी नियम,१९९९ मधील **कलम ५ मधील वैधानिक तरतूदीनूसार विवाह मंडळांची नोंदणी करणे बंधनकारक आहे.**

मा.उच्च न्यायालय, मुंबई, यांचेकडील **श्रीमती प्रिस्किलिया सॅम्यूअल विरुध्द केंद्र शासन व इतर** जनहित याचिका क्रं.**५२/२०१३** या संदर्भात दि.२३ मार्च,२०१६ च्या आदेशान्वये आपणांस सूचित करण्यात आले होते की, ग्रामीण व शहरी भागातील विवाह मंडळाची नोंदणीबाबतची माहिती दिनांक २८ एप्रिल २०१६ पूर्वी सादर करणे आवश्यक होते. तसेच दिनांक २३ मार्च,२०१६ रोजीच्या राज्यातील प्रमुख दैनिक वर्तमान पत्रात जाहीर आव्हान करण्यात आलेले आहे. **परंतु विवाह मंडळाची नोंदणी न केलेल्या मंडळावर कारवाई करणेबाबतची माहिती आपल्याकडून अद्यापही प्राप्त न झाल्यामुळे मा.उच्च न्यायालयाला माहिती देता आली नाही**. सदरील माहिती न्यायालयीन प्रकरणी सादर करावयाची असुन देखील निष्काळजीपणा दिसुन येत आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी आपल्या जिल्हयातील सर्व विवाह निबंधकांकडुन **विवाह मंडळाच्या नोंदणी न केलेल्या मंडळावर केलेल्या कारवाईची माहिती** प्राप्त करुन घ्यावी. सर्व विवाह निबंधकांनी कार्यक्षेत्रातील विवाह मंडळाचा आवश्यकता भासल्यास पोलीस विभागामार्फत शोध घेण्यात येवुन नोंदणी करावी. आपल्या स्तरावरुन प्रत्यक्ष महानगरपालिका, नगरपलिका तसेच पंचायत समिती क्षेत्रातील व ग्रामीण भागातील तालुका निहाय ज्यांच्या कार्यक्षेत्रात विवाह मंडळे कार्यरत आहेत अशा निबंधकांना अस्तित्वात असलेल्या सर्व विवाह मंडळांची नोंदणी करुन माहिती सादर करण्याच्या सुचना द्याव्यात. सर्व विवाह मंडळाची नोंदणी १५ दिवसांत पुर्ण करावी व त्याचा अहवाल विवाह मंडळाच्या नावाच्या यादीसह या कार्यालयास सादर करावा.तसेच ज्या जिल्हयांनी कार्यरत असलेल्या विवाह मंडळांची नावे व त्या मंडळावर कार्यवाही सुरु आहे, त्यांनी केलेली दण्डात्मक कारवाई बाबत या कार्यालयास कळवावे व त्यांची नोंदणी विनाविलंब करण्यात यावी.जर विवाह निबंधकांने विवाह मंडळांची नोंदणी करुन घेण्यासाठी नकार दिला असेल तर जिल्हास्तरावरुन वरीष्ठ कार्यालयाने लक्ष घालून सबंधीत निबंधकांवर **कलम १२(२) मधील वैधानिक तरतूदीनूसार** दण्डात्मक कार्यवाही करुन विवाह मंडळांची नोंदणी करुन घेण्यासाठी आदेशीत करावे.

जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या मार्फत गट विकास अधिकारी यांनी सर्व ग्रामीण व शहरी भागातील विवाह निबंधकांनी किती विवाह मंडळांनी नोंदणी केलेली आहे आणि किती मंडळांनी नोंदणी केलेली नाही याबाबतचे नियमित संनियंत्रण करावे व या कार्यालयास अवगत करावे. आपणांकडून अद्यापही या प्रकरणी कोण्तीही माहिति प्राप्त झालेली नाही, ही बाब अत्यंत खेदजनक आहे. आपल्या जिल्हयातील माहिती वेळेत प्राप्त न झाल्यास न्यायालयाचा अवमान केल्याप्रकरणी (contempt of court) आपले विरुध्द उचित कार्यवाही करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

उपसंचालक, आरोग्य सेवा (आमाजिआ), तथा
निबंधक, विवाह मंडळ व विवाह नोंदणी (विभागीय समन्वय)
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत सादर :-

१) मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) मा. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) मा. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) मा. प्रधान सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) मा. संचालक, आरोग्य सेवा तथा निबंधक, विवाह मंडळ व विवाह नोंदणी (राज्यस्तर), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत सस्नेह :-

१) आयुक्त महानगर पालिका......................(सर्व)
२) कार्यकारी अधिकारी तथा विवाह निबंधक, बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई
३) जिल्हाधिकारी ................................(सर्व)